# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 28/02/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग करून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर :— फिर्यादी/पिडीता वय २१ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप. क्र. २०८/१७ कलम ३०७, ३७६, ५०० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयात यातील फिर्यादीची आजी ही घरातील बकऱ्या चारण्यास गेली असता यातील फिर्यादी ही घरी हजर असता आरोपी नामे— चेतनलाल उर्फ नरेश झाडुपाल मनेश्वर वय २२ वर्ष, रा. बुडबुदा ता. पारशिवनी जि. बालाघाट याने फिर्यादीला अश्लील शब्दात बोलले यावरून फिर्यादीने आरोपीला शिवीगाळ केली व आरोपीने फिर्यादीला झुडुपात नेवुन तिच्याशी जबरी संभोग केला. तसेच विळयाने फिर्यादीच्या डोक्यावर, तोंडावर मारून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणाचे तपास तत्कालीन महिला पोलीस उपनिरीक्षक मृणालीनी वंजारी पोस्टे सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २८/०२/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमती शेन्डे मॅडम न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३२५ भांदवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ५,०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ०५ महिने साधी कैद तसेच कलम ३७६ भांदवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व २०,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती गवळी मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार मधुकर आदमने पोस्टे सावनेर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर